ePaper

## पक्षाकडून शिवतारेंना कारणे दाखवा नोटीस, 24 तासांत लेखी उत्तर देण्याचे आदेश!

| वर्ष - 7 । अंक - 307 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- चेन्नईचा गुजरातवर ६३ धावांनी विजय
- प्रियांकाने साजरी केली धुळवड
- विकसित भारताचे ध्येय मूर्खपणाचे
- महाविकास आघाडीत तिढा कायम


www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 27 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# शिरुरमध्ये महायुतीला उमेदवार मिळाला

# आढळरावांच्या हाती ‘घड्याळ’!

## » अमोल कोल्हे विरुद्ध शिवाजीराव आढळराव लढत निश्चित

। पुणे । महाईन्यूज

**संयुक्त शिवसेनेचे शिरूर लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी मंगळवारी (२६ मार्च) राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (अजित पवार गट) प्रवेश केला. शिरूर मतदारसंघातील मंचर येथील शिवगिरी मंगल कार्यालयात उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा अजित पवार यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी राज्याचे सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील, खेडचे आमदार दिलीप मोहिते-पाटीलदेखील उपस्थित होते. शिवाजीरावांच्या पक्षप्रवेशावेळी त्यांच्या शेकडो समर्थक कार्यकर्त्यांनीदेखील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.**



माजी खासादर शिवाजीराव आढळराव पाटील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार असतील, अशी चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू होती. ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून राष्ट्रवादी काँग्रेसच्या घड्याळ या निवडणूक चिन्हावर शिरूरची लोकसभा निवडणूक लढवणार आहेत असं बोललं जात होतं.. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यासाठी आग्रही भूमिका घेतली होती. मात्र खेडचे आमदार दिलीप मोहिते-पाटील यांनी आढळराव यांच्या नावाला विरोध दर्शवला होता. परंतु, अजित पवारांच्या शिष्टाईनंतर मोहिते-पाटील आणि आढळराव यांच्यात दिलजमाई झाली. त्यामुळे आढळराव यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमधील पक्ष प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला. त्यानुसार शिवाजीरावांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. आढळराव यांच्या प्रवेशानंतर त्यांची उमेदवारी जाहीर होण्याची केवळ औपचारिकताच राहणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटून दोन गट पडल्यानंतर रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्याव्यतिरिक्त सर्व खासदार शरद पवारांबरोबर थांबले. शिरूरचे खासदार अमोल कोल्हे यांनी अजित पवार गटात जाण्यास नकार दिला. त्यामुळे अजित पवार गटाला या मतदारसंघात एका तगड्या उमेदवाराची आवश्यकता होती. तर दुसऱ्या बाजूला शिरूर लोकसभेची जागा महायुतीत अजित पवार गटाला मिळणार असल्याने शिवाजीराव पाटलांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला असल्याचं सांगितलं जात आहे.

### आता आमचं मिटलं आहे : दिलीप मोहिते-पाटील

» “मलाही शिवसेनेतून राष्ट्रवादीत अजित दादांनी आणलं. घडाळ्याच्या चिन्हावर मी कसा उभा राहिलो? याची ही एक मोठी कथा आहे. हे सांगायला कोना ज्योतिषाची गरज नाही. माझं दिलीप वळसे आणि शिवाजी आढळरावांशी कोणतं ही वैयक्तिक वैर नाही. भामा आसखेड आणि कळंबोली धरणातील पाणी माझ्या तालुक्याला मिळावं, यासाठी माझा त्यांच्याशी संघर्ष सुरू होता. बोलल्याशिवाय काही मिळत नाही. मी बोलत होतो, त्यामुळे मतभेद दिसून आले. मात्र आता दिलीप वळसे आणि अजित दादांनी पाणी देतो, हे कबूल केलेलं आहे. इतकीच माझी भूमिका होती. आता माझा प्रश्न सुटला त्यामुळं हा पुढचा (लोकसभेचा) प्रश्न ही सुटणार आहे”, असं आमदार दिलीप मोहिते पाटील म्हणाले. “मी ही तापट आणि शिवाजी आढळराव हे देखील तापट. त्यामुळे दोन सारख्या स्वभावाची माणसं एकत्र आली की पटत नाही. त्यामुळे गेली 20 वर्षे शिवाजी आढळरावांशी संघर्ष होता. दोघेही शिवसेनेत होतो. त्यामुळे माघार घ्यायची कोणाची तयारी नव्हती. आता आमचं मिटलं आहे. पण माझ्या तालुक्यात आढळरावांनी इतका संघर्ष का केला? याचं उत्तर अद्यापही मला आढळरावांनी दिलेलं नाही”, अशी खंत दिलीप मोहिते पाटील यांनी व्यक्त केली.

# पिंपरी-चिंचवड पोलिसांना नाकाबंदीमध्ये आढळली तब्बल 50 लाखांची रोकड!

## » पोलिसांकडून चौकशी सुरु, पोलिसांची नऊ ठिकाणी नाकाबंदी

। पिंपरी चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी चिंचवड पोलिसांना नाकाबंदी दरम्यान उर्से टोल नाका येथे एका कार मध्ये 50 लाख रुपयांची रोकड आढळून आली आहे. संबंधित व्यक्तीकडे चौकशी केली असता त्याला या रकमेबाबत योग्य माहिती देता आली नसल्याने रोकड जप्त करण्यात आली आहे. तसेच याप्रकरणी पोलिसांकडून चौकशी केली जात आहे.

पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी दिलेल्या माहितीनुसार, लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड हद्दीमध्ये पोलिसांनी नऊ



ठिकाणी नाकाबंदी लावली आहे. पुणे मुंबई द्रुतगती मार्गावर उर्से टोलनाका येथे देखील नाकाबंदी करण्यात आली आहे. मंगळवारी (दि. 26) उर्से टोलनाका येथे शिरगाव पोलीस वाहनांची तपासणी करत असताना त्यांना एका स्कॉर्पिओ मध्ये 50 लाख रुपये रोख रक्कम मिळाली .

### पोलिसांनी केली रक्कम जप्त

» पोलिसांनी संबंधित चालकाकडे रकमेबाबत खुलासा मागितला. मात्र त्यास योग्य खुलासा करता आला नाही. त्यामुळे पोलिसांनी ती रक्कम जप्त केली आहे. या प्रकरणाची पोलिसांकडून चौकशी केली जात असल्याचेही पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी सांगितले.

# लोकसभा निवडणूक रणसंग्राम:

# ही देशाचं भविष्य ठरवणारी निवडणूक!

## मुरलीधर मोहोळः केंद्र सरकारच्या माध्यमातून पुणे शहरासाठी झालेली कामांचा प्रचार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे लोकसभा मतदार संघात महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ आणि महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्यात थेट लढत होणार आहे. रवींद्र धंगेकर कसबा विधानसभेची निवडणूक जिंकून आमदार झाले. आता ते लोकसभेसाठी उभे आहेत. त्यामुळे 'धंगेकर पॅटर्न' लोकसभेसाठी चालणार का? याच्या चर्चा सुरू आहेत. याला मुरलीधर मोहोळ यांनी कसबा पोटनिवडणूक आणि पुणे लोकसभा निवडणूक या दोन्ही निवडणुकांचा संदर्भ लावणे कसा चुकीचा आहे हे स्पष्ट करत, ही देशाचं भविष्य ठरवणारी निवडणूक आहे हे अगदी सर्वसामान्य माणसाला कळतं", असे म्हटले आहे.**




एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये लोकसभा निवडणुकीचे महत्व, देशाचे नेतृत्व कसे असावे, महायुतीचा उमेदवार निवडून येणे हे का आवश्यक आहे, त्यांचा दृष्टिकोनातून पुण्याच्या विकासाचे पुढील 50-100 वर्षांचे विकासाचे व्हीजन, केंद्र सरकारच्या माध्यमातून पुणे शहरासाठी झालेली कामे, इत्यादी गोष्टींबाबत भूमिका स्पष्ट केली. प्रतिस्पर्धी उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या उमेदवारीने धाकधूक वाढली आहे का? या प्रश्नाला उत्तर देताना मोहोळ म्हणतात की, अगदी सर्व सामान्य माणसाला, ज्याला या विषयात थोडं कळतं तो सुद्धा सांगेल की एका विधानसभेची पोटनिवडणूक आणि लोकसभेची निवडणूक याचा एकमेकांशी संदर्भ लावण्याचा प्रश्नच येत नाही. कारण ही निवडणूक देशाचे नेतृत्व कोणी केले पाहिजे?, देश कोणी चालवला पाहिजे?, कुठल्या नेतृत्वाच्या हातामध्ये देश सुरक्षित राहील?, कोणाच्या नेतृत्वाखाली देशाचा विकास होईल आणि देश पुढे जाईल? भारताला महासत्ताक देश म्हणून बनविण्याची क्षमता कोणामध्ये आहे? या सर्व गोष्टींचा विचार करूनच लोक मतदान करतात आणि करतील. त्यामुळे कसबा पोटनिवडणुकीसारख्या छोट्या निवडणुकीचे संदर्भ कुठे लागू होत नसतात. लोकसभेची निवडणूक मोठी आहे आणि देशाचे भविष्य ठरवणारी निवडणूक आहे त्यामुळे मला या गोष्टीचं काही वाटत नाही.

### पुणे शहराला सर्वोत्तम शहर करण्याचे स्वप्न

लोकसभेत पुण्याचा चेहरा म्हणून गेल्यानंतर पुण्यासाठी कुठले विषय मांडाल याबाबत बोलताना मोहोळ म्हणतात, देशासाठी आणि समाजासाठी आपल्याला काम करायचे ही पक्षाची शिकवण आहे. ब्रीद वाक्य सुद्धा तुम्ही बघा पहिलं प्राधान्य देश आहे, नंतर पक्ष आणि शेवटी मी हे आमचे ब्रीदवाक्य आहे आणि त्यामुळेच मला माझ्या शहरासाठी भविष्यात खूप काही गोष्टी करायच्या आहेत. त्याच्यावरती कामही सुरू आहे. पुणे शहराला जगातील सर्वोत्तम शहर करण्याचे स्वप्न आहे. आता पुणे शहर जगाच्या नकाशावर आहेच परंतु, अजून काही नागरी प्रश्न आहेत, काही सामाजिक प्रश्न असू शकतात या शहराला पुढच्या 50- 100 वर्षाच्या विकासाचे व्हीजन डोळ्यासमोर ठेवून आम्ही काम करणार आहोत.

आतापर्यंत जे काम केलं ते पुणेकरांच्या समोर आहे. मोदीजींनी पुणे शहरासाठी केलेली कामे असे म्हटल्यास आपल्या डोळ्यासमोर सर्व कामांची यादी झटकन येते. त्यामध्ये कागदावरची मेट्रो प्रत्यक्षात मेट्रो सुरु झाली. पुणेकर मेट्रोने प्रवास करायला लागले. पुण्याचे विमानतळ त्याचे एवढे मोठे विस्तारीकरण झालं. नवीन टर्मिनल इतकं सुंदर तयार झालं.पुण्याला एक वैद्यकीय महाविद्यालय मोदीजी सरकारने दिलं, चांदणी चौक सारखा एक हजार कोटीचा प्रकल्प आज पूर्ण झाला, प्रधानमंत्री आवास योजनेत हजारो घर आज पुण्यामध्ये उपलब्ध होत आहेत, नदी सुधारसारख्या एका चांगल्या प्रकल्पाला 1000 कोटी अनुदान मोदींच्या सरकारने दिले अशी कितीतरी काम आहेत. मला असं वाटतं की मोदीजींचं पुण्यासाठीचे योगदान, देश समर्थपणे पेलू शकणार एक नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहणं आणि स्थानिक पातळीवर आम्ही पाच वर्षांमध्ये केलेली काम आहेत. या सगळ्यांवरती आम्हाला विश्वास आहे की निश्चितपणे आम्हाला पुणेकर निवडून देतील.

पुणे या जगाच्या नकाशावरती स्वतःचं स्थान टिकवूंन आहे. पुण्याचे आंतरराष्ट्रीय विमानतळ जे आहे ते पूर्णत्वाकडे नेणं, त्याच्यासाठीचा पाठपुरावा करणे, भूसंपादनाचा विषय असेल, राज्य सरकारची असतील किंवा तांत्रिकदृष्ट्या केंद्र सरकारकडून काही यासाठी समन्वय साधून त्या पूर्ण करणे, शिवाय पुण्यामध्ये आज मेट्रो यशस्वी झाली आहे. वनाज ते रामवाडी असा पुण्याचा पश्चिम ते पूर्व भाग जोडणारा मेट्रोमार्ग कार्यान्वित झाला आहे. त्यामुळे लोक खुश आहेत. त्यामुळे मेट्रोचा अधिक विस्तार करणे,मार्ग वाढवणे ही काही केंद्र सरकारशी निगडीत महत्त्वाचे विषय आणि स्थानिक पातळीचे प्रश्न याला माझे प्राधान्य असेल असे मोहोळ म्हणाले.

### मोदीजींना एक मत देण्याची संधी मला पुणेकर देतील याचा मला विश्वास

» आपल्या राजकीय प्रवासाबाबत बोलताना मोहोळ म्हणतात, माझ्यासारखा एक वॉर्ड स्तरावरचा कार्यकर्त्याला पक्षाने लोकसभेचा उमेदवार म्हणून संधी मिळणं हे फक्त भारतीय जनता पक्षामध्येच हे घडू शकतं.म्हणून मला माझ्या पक्षाचा नक्कीच अभिमान आहे. जिथे कार्यकर्त्याला न्याय दिला जातो, कार्यकर्त्याला संधी दिली जाते हे तुम्हाला आमचे सर्व नेते बघितले तर लक्षात येईल. अगदी देवेंद्रजींपासून मोदीजींपर्यंत. माझ्यासारखा कुठलीही पार्श्वभूमी नसणारा आणि अत्यंत सर्वसामान्य कुटुंबातून आलेला वॉर्ड स्तरावरचा कार्यकर्ता म्हणून लोकसभेच्या मोठ्या निवडणुकीला उमेदवार म्हणून उभे राहताना नक्कीच समाधान आहे. लोकांच्या अपेक्षा आहेत, पुणेकरांच्या अपेक्षा आहेत. मला असं वाटतं की इथून मागे जे काही मी 25-30 वर्ष राजकीय सामाजिक जीवनात या शहरात काम केले मग ते संघटनात्मक असो किंवा लोकप्रतिनिधी म्हणून मला विश्वास वाटतो की पुणेकर निश्चितपणे मला संसदेमध्ये पुण्याचा प्रतिनिधित्व करण्याची आणि मोदीजींना एक मत देण्याची संधी नक्की देतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# डी.एस.के. कुंजबन सोसायटीत पाणीविरहित होळी!

## पाणी बचतीचा दिला संदेश : रंगोत्सवामध्ये रहिवाशांचा उत्स्फूर्त सहभाग

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर होळी व धुलीवंदन हे उत्सव पाण्याचा अपव्यय टाळून साजरे करण्याची गरज आहे. रासायनिक रंगांचा वापर न करता नैसर्गिक रंगोत्सव साजरा केल्यास पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवणे ही आता सवय झाली पाहिजे, पाणीबचतीसह पर्यावरणाच्या रक्षणास हातभार लागेल, असा संदेश डी.एस.के. कुंजबन सोसायटीच्या रहिवाशांनी दिला.**



काटे वस्ती, पुनावळे येथील डी.एस. के. कुंजबन सोसायटी कार्यकारी समिती व सांस्कृतिक समितीच्या पुढाकाराने होळी व धुलीवंदन उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षी पाणी बचतीचा संदेश देत होळी साजरी करण्याचा संकल्प करण्यात आला होता. त्याला रहिवाशांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सोसायटीच्या क्लब हाउस येथे सर्व सदस्यांनी पाणी विरहित एकमेकांना नैसर्गिक रंगांची उधळण केली. पाणी वाचवा, केमिकल विरहित रंग लावत, प्रेम स्नेह व आपली संस्कृती जपत धुलीवंदन धुमधडाक्यात साजरी करण्यात आली. धुलिवंदनची गाणी लावून त्यावर महिला, पुरुष, लहान मुले यांनी ठेका धरीत नृत्य केले. रंगोत्सवानिमित्त सांस्कृतिक समितीने आकर्षक सजावट केली होती. डी.एस.के. कुंजबन सोसायटीमध्ये महाराष्ट्रासह देशाच्या कानाकोपऱ्यातील रहिवाशी आहेत. या सोसायटीमध्ये सर्व सण-उत्सव एकोप्याने उत्साहात साजरे केले जातात. भारतीय संस्कृती संवर्धनासाठी कार्यकारी समिती व सांस्कृतिक समिती आग्रही असते.

> पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या आणि पाण्याचा उपलब्ध साठा याचे प्रमाण व्यस्त असल्यामुळे पाणी टंचाईचा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर्षी उन्हाळा सुरू झाला असतानाच पाणी पुरवठा कमी प्रमाणात होत आहे. पाणी बचत ही काळाची गरज आहे. त्यामुळे पाण्याचा अपव्यय न करता पाणीमुक्त होळी साजरी करण्याचे आवाहन रहिवाशांना करण्यात आले. पाणी बचतीसाठी प्रत्येकाने पुढाकार घेणे गरजेचे आहे.
>
> – **उत्तम नलावडे,** सचिव, डी.एस.के. कुंजबन.

## उपयोगकर्ता शुल्क नको; फक्त मिळकतकर भरा

# मिळकतकर वसुलीसाठी ‘टार्गेट’!

## पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाचे आवाहन

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**कर संकलन विभागाच्या मालमत्ता कराच्या ऑनलाइन बिलामध्ये उपयोग कर्ता शुल्काची रक्कम दिसत असली तरी शासन स्थगिती आदेशामुळे एकूण भरायची जी रक्कम आहे, ती उपयोग कर्ता शुल्क वजा करून दर्शविण्यात आली आहे. मालमत्ता धारकांना उपयोग कर्ता शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. तसेच अंतिम देय रक्कम जी बिलामध्ये दर्शविण्यात आली आहे, त्यामध्ये उपयोग कर्ता शुल्काचा समावेश नाही. त्यामुळे रहिवाशी मिळकत धारकांनी आपला थकीत मालमत्ता कर तत्काळ भरावा, असे आवाहन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी केले आहे.**




पिंपरी-चिंचवड शहरात 6 लाख 25 हजार मालमत्ता आहेत. यापैकी 4 लाख 33 हजार 759 मालमत्ता धारकांनी आपला पूर्ण कराचा भरणा केला आहे. त्यामुळे आत्तापर्यंत महापालिकेच्या तिजोरीत 886 कोटींचा महसूल जमा झाला आहे. असे असले तरी 2024-25 या आर्थिक वर्षात कर संकलन विभागाला 1 हजार कोटींचे उदिष्ट देण्यात आले आहे. आर्थिक वर्ष संपण्यास अवघे पाच दिवस बाकी असताना 114 कोटींची वसुली करण्याचे मोठे आव्हान कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त नीलेश देशमुख आणि त्यांच्या टीमपुढे असणार आहे. तर कर संकलन विभागाकडून थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करणे, थकबाकीदारांची नावे वर्तमान पत्रात प्रसिध्द करणे, नळ कनेक्शन खंडीत करणे, जनजागृती करण्यासह विविध मोहिमा हाती घेतल्या आहेत.

अंतिम टप्प्यात क्रिकेटच्या ट्वेंटी- ट्वेंटी सामन्याप्रमाणे जास्तीत-जास्त कर वसुलीसाठी कर संकलन विभागाने कंबर कसली आहे. असे असतानाच कर संकलन विभागाचे कर्मचारी सदनिकाधारकांकडे कर वसुलीसाठी जातात, तेव्हा अनेकांनी उपयोग कर्ता शुल्क रद्द झाला असताना त्या रक्कमेचा आमच्या बिलात समावेश झाला आहे, त्यामुळे आम्ही अद्याप कर भरला नसल्याचे सांगत आहेत. मात्र, ऑनलाइन बिलामध्ये उपयोग कर्ता शुल्काची रक्कम दिसत असली तरी शासन आदेशामुळे शुल्क वसुलीला स्थगिती देण्यात आलेली आहे. बिलामध्ये एकूण भरायची जी रक्कम आहे, ती उपयोग कर्ता शुल्क वजा करून दर्शविण्यात आली आहे. मालमत्ता धारकांना उपयोग कर्ता शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. तसेच अंतिम देय रक्कम जी बिलामध्ये दर्शविण्यात आली आहे, त्यामध्ये उपयोग कर्ता शुल्काचा समावेश नाही. त्यामुळे मालमत्ता धारकांनी फक्त आपला थकीत कर त्वरीत भरावा.

दरम्यान, शहरात 5 हजार 500 लहान-मोठ्या सोसायट्या आहेत. यामधील 65 हजार 583 सदनिकाधारकांकडे तब्बल 161 कोटींचा कर थकीत आहे. त्यामुळे सदनिका धारकांनी आपल्या सदनिकेचा पाणी पुरवठा खंडीत होऊ नये, त्याचबरोबर सदनिका जप्त होऊ नये म्हणून तत्काळ कर भरावा. अन्यथा नाईलाजाने कठोर कारवाई करावी लागेल, असा इशाराही महापालिकेने दिला आहे.

### निवासी मालमत्ता धारकांकडे 354 कोटींची थकबाकी

पिंपरी-चिंचवड शहरात 1 लाख 48 हजार 203 निवासी मालमत्ता आहे. या मालमत्ता धारकांना वेळोवेळी कर भरण्याबाबत आवाहन केले. मात्र, त्यानंतरही कर न भरणा-या या मालमत्ता धारकांकडे तब्बल 354 कोटींची थकबाकी आहे. कर भरण्याची ऐपत असतानाही कर भरण्यास टाळाटाळ मालमत्ता धारकांनी करू नये. त्याउलट थकीत करावर दंडाची रक्कम दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे मालमत्ता धारकांचेच नुकसान होत असल्याने अशा थकबाकीदार मालमत्ता धारकांनी तत्काळ कर भरून शहर विकासामध्ये योगदान द्यावे, असे आवाहन कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी केले आहे.

---

## श्रमिकांचा आवाज संसदेत उठविण्यासाठी मावळ लोकसभेसाठी उमेदवारी द्या

### राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष यशवंत भोसले यांची पत्रकार परिषदेत मागणी

।पिंपरी चिंचवड ।प्रतिनिधी ।महाईन्यूज

**भारतीय जनता पक्षाचे देशभर काम चांगले आहे. चाकण, भोसरी, चिंचवड, तळेगाव हे मोठ्या प्रमाणात इंडस्ट्रिअल एरिया आहेत. विशेष बाब म्हणजे मावळ लोकसभा मतदार संघात 70 टक्के कामगार वर्ग आहे. भाजपचे जे कोणी तिकिट देण्याच्या प्रक्रियेत कार्यरत आहेत, त्यांनी श्रमिक, तसेच कामगारांचे प्रश्न लोकसभेत मांडण्यासाठी मला भाजपतर्फे मावळ मधून उमेदवारी द्यावी, अशी आग्रही मागणी राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष यशवंत भोसले यांनी पिंपरी येथील आयोजित पत्रकार परिषदेत केली.**




कामगार नेते यशवंत भोसले हे गेल्या 30 वर्षांपासून कार्यरत असून, 10 वर्षांपासून भारतीय जनता पक्षाचे सक्रिय सदस्य आहेत. शासनाच्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळावर आणि श्रम मंत्रालय कामगार कायदे पुनर्गठन समिती नॅशनल फ्रंट ऑफ इंडियन ट्रेड युनियन या भारतीय जनता पार्टीच्या सलग्न असलेल्या कामगार संघटनेचे उपाध्यक्ष समितीवर सदस्य म्हणून ते काम पाहत आहेत.

मावळ लोकसभा मतदार संघामध्ये पिंपरी चिंचवड, संघामध्ये तळेगाव, लोणावळा, पनवेल, कर्जत, उरण, मावळ (तळेगाव) इत्यादी शहरामध्ये औद्योगिकीकरण विस्तारले असून, लाखोंच्या संख्येने कामगार वर्ग स्थिरावलेला असून, दिल्ली दरबारी त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी मला उमेदवारी द्यावी.

श्रमिक, तसेच कामगारांचे प्रश्न लोकसभेत मांडण्यासाठी मला भाजपतर्फे मावळ मधून उमेदवारी द्यावी मी शंभर टक्के विजयी होऊ शकतो, असा आत्मविश्वास यशवंत भोसले यांनी व्यक्त केला आहे.

> हल्ली उमेदवारी ही जातीपाती बघून दिली जाते. हा अमूक जातीचा त्याच्यामागे एव्हढे लोक आहेत. त्या त्याला उमेदवारी. हे कुठले गणित आहे. श्रमिकांचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी श्रमिकच पाहिजे. इथे ठेकेदार आणि मालक यांचे प्रतिनिधीत्व ठेकेदार आणि मालकच करत आहेत. श्रमिकांचा आवाज उठवायला त्यांना कुठे वेळ असतो. त्यासाठी श्रमिक, कामगार वर्गाचा आवाज उठविण्यासाठी मला उमेदवारी द्या. मी भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ताच आहे.
>
> **-यशवंत भोसले,**
> राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष

# भाजपविरोधी ऐक्याचा 'जेएनयू'तील धडा




**लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजपेतर 'इंडिया' आघाडीच्या चिंधड्या उडत असताना जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील ('जेएनयू'तील) डाव्या विचारांच्या विद्यार्थी संघटनांनी 'जेएनयू स्टुडंट्स युनियन'च्या निवडणुकीत दाखवलेली एकजूट वाखाणण्याजोगी म्हणता येईल. पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस, डावे पक्ष आणि काँग्रेस तिघेही 'इंडिया'चे घटक असले तरीही लोकसभा निवडणुकीत ते एकमेकांविरोधात लढत आहेत.**



बिहारमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दलाची जागावाटपाची बोलणी फिसकटली आहेत. तिथे दोन्ही पक्षांनी स्वतंत्रपणे लढण्याची तयारी केली आहे. महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार आणि शिवसेना-ठाकरे गट यांच्यामध्ये जागावाटपाच्या असंख्य चर्चा झाल्या आहेत. भाजपविरोधात तगडा पर्याय उभा करण्यासाठी पाटण्यात झालेल्या पहिल्या बैठकीनंतर विरोधकांच्या एकजुटीचा भाजपने धसका घेतला होता. पाच वर्षांत भाजपने ज्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील (एनडीए) घटक पक्षांकडे ढुंकूनही पाहिले नव्हते, त्यांचा दिल्लीत पंतप्रधान मोदींनी मेळावा घेतला होता. आता तर भाजप देशभर नवे मित्र शोधून काढून त्यांच्या झोळीत जागा टाकत आहे. या पार्श्वभूमीवर 'जेएनयू' निवडणुकीत चारही डाव्या विद्यार्थी संघटनांनी संयुक्तपणे लढून अध्यक्ष-उपाध्यक्ष, महासचिव-सहमहासचिव या चारही पदांवर मिळवलेला विजय लक्षणीय. जेएनयू'मधील चार वर्षांनी झालेली ही निवडणूक २०२४च्या लोकसभा निवडणुकीप्रमाणे वैचारिक लढाईच होती. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेमार्फत (अभाविप) संघ-भाजप 'जेएनयू'वर कब्जा करण्याचा सातत्याने प्रयत्न करत असताना २०१६ पासून ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशन (आयसा), डेमोक्रॅटिक स्टुडंट्स फेडरेशन (डीएसएफ), स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) आणि ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन (एआयएसएफ) या चार संघटना 'अभाविप'चा पराभव करत आहेत. यंदा महासचिव पदासाठी डाव्यांची संयुक्त उमेदवार स्वाती सिंह हिचे नामांकन मतदानाच्या काही तास आधी रद्द केल्यानंतर डाव्या आघाडीने आंबेडकरी-ओबीसी विचारांच्या 'बिरसा आंबेडकर फुले स्टुडंट्स असोसिएशन'च्या (बापसा) प्रियांशी आर्य हिला ऐनवेळी पाठिंबा देण्याचा शहाणपणाचा निर्णय घेतला. संघ-भाजपच्या विचारांशी 'जेएनयू'मध्ये यशस्वी मुकाबला करणाऱ्या विद्यार्थी संघटनांची परिपक्वता 'इंडिया'तील घटक पक्षांसाठी मोठा धडा ठरेल. करोनापूर्वी २०१९ मधील निवडणुकीत 'एसएफआय'च्या आयशी घोष अध्यक्ष झाल्या होत्या. त्यानंतर आत्ता 'जेएनयू'मध्ये निवडणूक झाली असून दरम्यानच्या चार वर्षांच्या काळात 'जेएनयू'ने हिंसक आंदोलने पाहिली. जेएनयू विद्यार्थी संघटनेने 'सीएए'विरोधात तीव्र आंदोलन केले होते. त्याविरोधात 'अभाविप' आक्रमक होणे साहजिक होते. ५ जानेवारी २०२० च्या रात्री चेहऱ्यावर रुमाल बांधून ५० जणांच्या टोळक्याने 'जेएनयू'मध्ये धुडगूस घातला होता, त्यांनी विद्यार्थ्यांनाच नव्हे तर प्राध्यापकांनाही मारहाण केली होती. त्यावेळी 'जेएनयू'चे विद्यार्थी हॉस्टेलच्या शुल्कात केलेल्या दीडशे टक्के वाढीला विरोध करत होते. हिंसाचार करणाऱ्या टोळक्यातील एकालाही दिल्ली पोलिसांनी अटक केली नाही. 'अभाविप'च्या तत्कालीन सहसचिव अनिमा सोनकर यांनी दोन सशस्त्र तरुण 'अभाविप'चे सदस्य असल्याचे मान्य केले होते. गेल्या दहा वर्षांमध्ये 'जेएनयू'ने अनेक आंदोलने पाहिली असून इथे संघ-भाजपविरोधात डाव्यांची वैचारिक लढाई लढली जात आहे. विद्यार्थी संघटनेच्या निवडणुकीत त्याची प्रखरता जाणवत राहते. या वेळी डाव्यांच्या संयुक्त आघाडीने धनंजय या दलित उमेदवाराला अध्यक्ष केले आहे. निवडणूक जिंकल्यानंतर रविवारी रात्री 'जेएनयू'च्या आवारात केलेल्या भाषणामध्ये धनंजयने 'इंडिया'चे मुद्दे नेमकेपणाने मांडले आहेत. डाव्या विचारांचे लोक शहरी नक्षल, दहशतवादी, विभाजनवादी असल्याचा भाजप खोटा प्रचार करतो; पण आम्ही शेतकऱ्यांच्या हितासाठी लढत आहोत. पण तुम्ही (प्रशासन) ग्रंथालयाच्या निधीत ८० टक्के कपात केली आहे. अतिरिक्त जागा कमी केल्या आहेत. 'जेएनयू'मध्ये शिक्षण घेण्याचे देशभरातील विद्यार्थ्यांचे स्वप्न असते.

## संपादकीय »

### टंचाईचे लाभार्थी

***सोडवणूक करण्याऐवजी समस्या चिघळवत ठेवणे व त्यातून राजकीय हेतू साध्य करणे हा भारतीय राजकारणाचा स्थायिभाव.***

सोडवणूक करण्याऐवजी समस्या चिघळवत ठेवणे व त्यातून राजकीय हेतू साध्य करणे हा भारतीय राजकारणाचा स्थायिभाव. त्याचा फटका बसतो तो सामान्यांना. मात्र राजकारण करणाऱ्यांना सोयरसुतक नसते. सामान्यांना वेदना देणारी समस्या सुटली तर आश्वासनाची फुंकर तरी कशावर मारायची याच विचारातून कदाचित या स्थायिभावाचा जन्म झाला असावा. त्यामुळे वर्षानुवर्षे लोटली तरी समस्या तशाच राहतात व त्यावर राजकारण करणाऱ्यांचा आलेख मात्र उंचावत जातो. दरवर्षी उन्हाच्या झळा वाढल्या की भीषण रूप घेत जाणारी पाणीटंचाईची समस्या हे याचे प्रातिनिधिक उदाहरण! दरवर्षी पडणाऱ्या पावसाचे कमी-अधिक प्रमाण लक्षात घेता या टंचाईचे तीव्र वा मध्यम स्वरूप समोर येत राहते. पाण्यावरून भांडणे, मारामारी, प्रसंगी पडणारे खून हेच चित्र सार्वत्रिक असते. ते बदलण्याची भाषा राज्यकर्ते करतात आणि त्याला भुलून लोक मतांचे दान त्यांच्या झोळीत टाकतात.

**कधीकाळी कथित समाजसेवक अण्णा हजारेंना हातीशी धरून अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीत भ्रष्टाचारविरोधी आंदोलन केले होते. दहा वर्षांनी केजरीवाल यांनाच भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अटक झाली आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना काव्यगत न्याय मिळाला असे कदाचित भाजप म्हणू शकेल.**

# सहानुभूतीच्या लाटेवर केजरीवाल?

हजारे आणि केजरीवाल यांनी काँग्रेसचे सरकार घोटाळेबाज असल्याचा दावा करत हे आंदोलन उभे केले आणि भाजपला सत्तेवर येण्याची संधी दिली. गुजरात दंगलीमुळे वादात सापडलेले तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान होण्याची संधी दिली. याच मोदी सरकारमधील केंद्रीय गृहमंत्रालयाच्या अखत्यारीतील तपास यंत्रणांनी केजरीवाल यांना तुरुंगात टाकले आहे. रामलीला मैदानावर अण्णा हजारेंच्या उपोषणाला लाखो लोकांनी पाठिंबा दिला होता. तिथे जमलेली गर्दी संघ आणि भाजपने जमवलेली होती, हे आंदोलनात सहभागी झालेल्या समाजवाद्यांना नंतर कळले. तोपर्यंत काँग्रेस बदनाम झाला होता, लोकांचा पाठिंबा गमावला होता. मोदींची वाट सुकर झाली होती. पाठोपाठ केजरीवालही दिल्लीचे मुख्यमंत्री झाले. केजरीवालांनी निवडणुकीचे नागरी प्रारूप शोधून काढले. २०० युनिट वीज मोफत, महिलांना बस प्रवास मोफत, मोहल्ला क्लिनिक, सरकारी शाळांचा दर्जा सुधार अशा अनेक गोष्टींमुळे



दिल्लीत केजरीवाल लोकप्रिय झाले. त्यांनी दिलेल्या नागरी सुविधांकडे बघून दिल्लीकरांनी त्यांना सलग दोनदा भरघोस मते दिली. दिल्लीतील केजरीवाल प्रारूपाचे अनुकरण अन्य राज्यांत अन्य पक्षांनीही केले. हे पाहिले तर केजरीवालांचे रेवडींचे धोरण यशस्वी ठरले, असे म्हणता येईल. मोदींनी रेवडींचा विरोध केला असला तरी, मोफत धान्य योजना ही एकप्रकारे रेवडीच ठरते. त्यामुळे केजरीवालांनी भाजपलाही रेवडींच्या मार्गाने चालणे भाग पाडले. दिल्लीकरांना नागरी सुविधा देताना केजरीवाल यांनी महसूलवाढीसाठी मद्य विक्री धोरण बदलले. मुख्य सचिवांच्या अहवालानंतर नायब राज्यपालांनी हे प्रकरण सीबीआयकडे दिले. मद्य विक्री धोरण बदलताना भ्रष्टाचार झाल्याचा दावा सीबीआयने केला. त्यांच्या आरोपपत्रामध्ये अरविंद केजरीवालांचे नाव नसले तरी त्यांचे निष्ठावान असलेले उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना व नंतर संजय सिंह यांना अटक झाली. सक्तवसुली संचालनालयही (ईडी) त्यांची चौकशी करत आहे. सिसोदियांना वर्षभरानंतरही जामीन मिळालेला नाही. संजय सिंह यांना तुरुंगात जाऊन पाच महिने होऊन गेले. याप्रकरणी 'ईडी'ने नऊ वेळा चौकशीसाठी केजरीवाल यांना नोटीस बजावल्या. पण, ते गेले नाहीत. ईडी नोटिसा पाठवत राहिली, त्या काळात केजरीवालांनी तुरुंगात जाण्याची राजकीय तयारी केली. आता केजरीवाल तुरुंगात गेले आहेत. केजरीवाल तुरुंगातून सरकार चालवतील की, नवा मुख्यमंत्री निवडला जाईल, हे काही दिवसांत कळेल. दिल्लीतील या घडामोडी लोकसभा निवडणुकीला २५ दिवस उरले असताना झाल्यामुळे आप आणि काँग्रेसच्या युतीचे काय होणार हा प्रश्न विचारला जात आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# महाविकास आघाडीत तिढा कायम!

## शरद पवारांचा तडकाफडकी उद्धव ठाकरेंना फोन

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीत रस्सीखेच सुरु आहे. राज्यातील तीन जागांवरून अजूनही महाविकास आघाडीत तिढा कायम असल्याचे चित्र आहे. सांगली, भिवंडी आणि दक्षिण मध्य मुंबई मतदारसंघावरून अजूनही महाविकास आघाडीत चर्चा सुरु आहे. या मतदार संघाच्या जागावाटपाबाबत अजूनही एकमत होत नसल्याचे चित्र आहे.**



सांगलीच्या जागेवरून शिवसेना ठाकरे गटआणि काँग्रेसमध्ये रस्सीखेच पाहायला मिळत आहे. भिवंडीच्या जागेवरून काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार गटात तर दक्षिण मध्य मुंबईच्या जागेवरून काँग्रेस आणि ठाकरे गटात तिढा आहे. या तीन जागांचा तिढा सोडवण्यासाठी काल शरद पवार यांच्या उपस्थितीत उद्धव ठाकरे, संजय राऊत आणि जयंत पाटील यांची काल बैठक झाली. मात्र या बैठकीत तिन्ही जागांचा तिढा सुटला नाही. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी शरद पवारांची भेट घेतली. या जागांचा तिढा संपवा, अशी मागणी बाळासाहेब थोरातांनी केली. त्यानंतर शरद पवारांनी उद्धव ठाकरेंशी याबाबत चर्चा करण्यात आली. मात्र या जागांवर अद्याप महाविकास आघाडीच्या नेत्यांचे एकमत झाले नसल्याचे दिसून येत आहे. तीन जागांचा तिढा निर्माण झाल्यामुळे शिवसेना ठाकरे गट अद्याप आपली यादी जाहीर करू शकलेला नाही. या जागांवरती निर्णय घ्यायचा असेल तर तुम्ही थेट दिल्लीतील नेत्यांशी बोला, असं राज्यातील काँग्रेस नेत्यांची भूमिका घेतली आहे. त्यामुळे या तीन जागांच्या भूमिकेमुळे महाविकास आघाडीत बिघाडी होते की काय? अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. दरम्यान, भिवंडी लोकसभा काँग्रेसनेच लढवली पाहिजे, यासाठी आग्रही मागणी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आली आहे. भिवंडी लोकसभा क्षेत्रात काँग्रेस बळकट आहे. त्यामुळं ही जागा मित्र पक्षाकडे गेली तर कोकणातून काँगेस हद्दपार होईल. याकडे पक्षश्रेष्ठींनी लक्ष दिले पाहिजे. 2014 च्या लोकसभेसाठी राहुल गांधी यांची सभा भिवंडीत झाली होती. त्यावेळी राहुल गांधी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता.आणि त्यासाठी न्यायालयात आजही राहुल गांधी यांना यावे लागत आहे. या सर्वाचा बदला घ्यायचा आहे. म्हणून ही जागा काँग्रेसकडेच असली पाहिजे, अशी मागणी पक्षश्रेष्ठींकडे करणार असल्याची माहिती ठाणे ग्रामीण काँग्रेस अध्यक्ष तथा भिवंडी लोकसभेतील काँग्रेस पक्षाचे दावेदार दयानंद चोरघे यांनी केली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी शरद पवारांची भेट घेतली. या जागांचा तिढा संपवा, अशी मागणी बाळासाहेब थोरातांनी केली. त्यानंतर शरद पवारांनी उद्धव ठाकरेंशी याबाबत चर्चा करण्यात आली. मात्र या जागांवर अद्याप महाविकास आघाडीच्या नेत्यांचे एकमत झाले नसल्याचे दिसून येत आहे. तीन जागांचा तिढा निर्माण झाल्यामुळे शिवसेना ठाकरे गट अद्याप आपली यादी जाहीर करू शकलेला नाही. या जागांवरती निर्णय घ्यायचा असेल तर तुम्ही थेट दिल्लीतील नेत्यांशी बोला, असं राज्यातील काँग्रेस नेत्यांची भूमिका घेतली आहे. त्यामुळे या तीन जागांच्या भूमिकेमुळे महाविकास आघाडीत बिघाडी होते की कायदरम्यान, भिवंडी लोकसभा काँग्रेसनेच लढवली पाहिजे, यासाठी आग्रही मागणी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आली आहे.

### आघाडीत बिघाडी होते की काय?

» सांगलीच्या जागेवरून शिवसेना ठाकरे गटआणि काँग्रेसमध्ये रस्सीखेच पाहायला मिळत आहे. भिवंडीच्या जागेवरून काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार गटात तर दक्षिण मध्य मुंबईच्या जागेवरून काँग्रेस आणि ठाकरे गटात तिढा आहे. या तीन जागांचा तिढा सोडवण्यासाठी काल शरद पवार यांच्या उपस्थितीत उद्धव ठाकरे, संजय राऊत आणि जयंत पाटील यांची काल बैठक झाली. मात्र या बैठकीत तिन्ही जागांचा तिढा सुटला नाही. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी शरद पवारांची भेट घेतली. या जागांचा तिढा संपवा, अशी मागणी बाळासाहेब थोरातांनी केली. त्यानंतर शरद पवारांनी उद्धव ठाकरेंशी याबाबत चर्चा करण्यात आली. मात्र या जागांवर अद्याप महाविकास आघाडीच्या नेत्यांचे एकमत झाले नसल्याचे दिसून येत आहे. तीन जागांचा तिढा निर्माण झाल्यामुळे शिवसेना ठाकरे गट अद्याप आपली यादी जाहीर करू शकलेला नाही. या जागांवरती निर्णय घ्यायचा असेल तर तुम्ही थेट दिल्लीतील नेत्यांशी बोला, असं राज्यातील काँग्रेस नेत्यांची भूमिका घेतली आहे. त्यामुळे या तीन जागांच्या भूमिकेमुळे महाविकास आघाडीत बिघाडी होते की काय? अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# ईडी आणि राष्ट्रीय तपास यंत्रणेचे बीकेसीत कार्यालय

## ईडीला 2000 तर राष्ट्रीय तपास यंत्रणेला 1500 चौ. मीटरचा भूखंड

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आर्थिक गुन्ह्यांचा तपास करणाऱ्या सक्तवसूली संचालनालय (ईडी) तसेच राष्ट्रीय तपास यंत्रणेचे लवकरच बीकेसीत भव्य आणि स्वतंत्र कार्यालय उभारले जाणार आहे.**

यंत्रणांना कार्यालयासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून बीकेसीतील भूखंड वितरीत करण्यात येणार असून लवकरच या भूखंडांचा ताबा या यंत्रणांना दिला जाणार आहे. ईडीला बीकेसीतील २००० चौ. मीटरचा तर राष्ट्रीय तपास यंत्रणेला १५०० चौ. मीटरचा भूखंड ८० वर्षांच्या भाडेतत्वावर भूखंडाचे वितरण केले जाणार आहे. या भूखंडासाठीचे अधिमूल्य भरुन घेण्याची प्रक्रिया सुरु आहे.ईडीचे मुंबईत सध्या तीन कार्यालये आहेत. यातील दोन कार्यालये बलार्ड पियर तर एक वरळीत आहे. ईडीच्या कामाची वाढती व्याप्ती पाहता एकत्रित मोठ्या, स्वतंत्र कार्यालयाची गरज निर्माण झाली. तर राष्ट्रीय तपास यंत्रणेलाही स्वतंत्र कार्यालयाची गरज आहे. त्यानुसार या दोन्ही




यंत्रणांनी एमएमआरडीएकडे बीकेसीतील जागेची मागणी केली होती. या मागणीनुसार ईडीला जी ब्लॉकमधील सी ३५ हा भूखंड तर राष्ट्रीय तपास यंत्रणेला सी ३५ ब भूखंड वितरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला. ईडी वितरीत करण्यात येणारा सी ३५ भूखंड २००० चौ. मीटरचा असून यावर १०,५०० चौ.मीटर इतर बांधकाम अनुज्ञेय आहे. तर राष्ट्रीय तपास यंत्रणेसाठीचा सी ३५ ब भूखंड १५०० चौ. मीटरचा असून यावर ६००० चौ.मीटर इतके बांधकाम अनुज्ञेय आहे. हे दोन्ही भूखंड संबंधित यंत्रणांना ३ लाख ४४ हजार ५०० रुपये प्र. चौ. मीटर दराने वितरीत करण्यासंबंधीच्या प्रस्तावाला मान्यताया मान्यतेनुसार भूखंडाचे ३० टक्के अधिमूल्य या दोन्ही यंत्रणांनी विहित मुदतीत अदा करणे आवश्यक होते. मात्र हे अधिमूल्य अदा न केल्याने आता या दोन्ही यंत्रणांना अधिमुल्य अदा करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. तेव्हा आता भूखंडाची रक्कम भरत भूखंडाचा ताबा घेत या दोन्ही यंत्रणांकडून बीकेसीत कार्यालये उभारली जाण्याची शक्यता आहे.

### भाडेतत्वावर भूखंडाचे वितरण

» भूखंडासाठी ३६२ कोटी रुपये मोजावे लागणार आहेत.यंत्रणांना कार्यालयासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून बीकेसीतील भूखंड वितरीत करण्यात येणार असून लवकरच या भूखंडांचा ताबा या यंत्रणांना दिला जाणार आहे. ईडीला बीकेसीतील २००० चौ. मीटरचा तर राष्ट्रीय तपास यंत्रणेला १५०० चौ. मीटरचा भूखंड ८० वर्षांच्या भाडेतत्वावर भूखंडाचे वितरण केले जाणार आहे.

# विकसित भारताचे ध्येय मूर्खपणाचे!

## रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांची टीका

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**भारताचा आर्थिक विकास मोठ्या प्रमाणात होत आहे, असा विश्वास निर्माण करून त्याची मोठ्या प्रमाणात जाहीरात करण्यात येत आहे. अशी जाहीरात करून भारत सर्वात मोठी चूक करत आहे. सर्वप्रथम भारताला महत्त्वाच्या समस्यांचे निराकरण करावे लागेल, त्यानंतरच भारत शाश्वत विकासाच्या दृष्टीने पुढे जाऊ शकतो, असे प्रतिपादन भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांनी केले आहे. लोकसभा निवडणुकीनंतर ज्या पक्षाचे सरकार येईल, त्यांना सर्वप्रथम आपल्या देशातील मनुष्यबळाचे शिक्षण आणि कौशल्य विकास यावर काम करावे लागेल. हे जर केले नाही, तर भारताला आपल्या तरूण लोकसंख्येचा काहीही लाभ होणार नाही, असेही ते म्हणाले.**



ब्लुमबर्गने दिलेल्या वृत्तानुसार, रघुराम राजन म्हणाले की, भारताने सध्या अर्थव्यवस्थेच्या अवाजवी प्रसिद्धीवर जो विश्वास टाकलाय, तो चिंतेचा विषय आहे. “अर्थव्यवस्था रुळावर आणण्यासाठी आपल्याला अनेक वर्ष कठोर परिश्रम करावे लागले होते. सध्या अर्थव्यवस्थेबद्दलची जी प्रसिद्धी केली जात आहे, ती राजकारण्यांकडून होत आहे. कारण त्यांना त्याची गरज आहे. पण इतर भारतीय नागरिकांनी त्यावर विश्वास ठेवणे, ही सर्वात मोठी चूक होऊ शकते.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ रोजी भारत विकसित राष्ट्र बनलेले असेल, असे ध्येय ठेवलेले आहे. याबद्दल प्रश्न विचारला असता रघुराम राजन म्हणाले की, हे ध्येय मूर्खपणाचे आहे. जर देशातल्या मुलांना माध्यमिक शिक्षण मिळत नसेल, अनेक विद्यार्थी शिक्षण घेण्यापासून वंचित राहत असतील, तर हे ध्येय गाठता येणार नाही. “आपल्याकडे प्रचंड मनुष्यबळ आहे. पण या मनुष्यबळाच्या हाताला काम दिले नाही, तर त्याचा काहीही उपयोग होणार नाही. त्यामुळे भारताला सर्वातआधी या मनुष्यबळाचे कौशल्य विकसित करून त्यांना काम करण्यासाठी तयार करावे लागेल आणि त्यानंतर त्यांना रोजगारही उपलब्ध करून द्यावा लागेल”, असे रघुराम राजन यांनी स्पष्ट केले.राजन यांनी घसरलेल्या शैक्षणिक दर्जावरही भाष्य केले. ते म्हणाले, भारतीय शालेय विद्यार्थ्यांची शिकण्याची पात्रता करोना महामारीनंतर २०१२ च्या पूर्वीच्या स्तरावर पोहोचली आहे. इयत्ता तिसरीतील २०.०५ टक्के विद्यार्थ्यांना वाचता येत नाही आणि इयत्ता दुसरीतील मुलांना लिहिता येत नाही. आशिया खंडातील व्हिएतनाम सारख्या देशातील साक्षरतेपेक्षाही आपला साक्षरतेचा दर घसरलेला आहे.मोदी सरकारने चीप उत्पादनावर भर दिला आहे. यावरही राजन यांनी टीका केली. ते म्हणाले, “मोदी सरकार चीप उत्पादनाला अनुदान देत आहे. मात्र उच्च शिक्षणाच्या वार्षिक अर्थसंकल्पाला कात्री लावली जात आहे. सेमी कंडक्टर उत्पादन क्षेत्र स्थापन करण्यासाठी ७६० अब्ज रुपये राखून ठेवण्यात आले आहेत. तर उच्च शिक्षणासाठी केवळ ४७६ अब्ज रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सरकारने चीप उत्पादनापेक्षा उच्च शिक्षणावर अधिक खर्च करण्याची गरज आहे. जेणेकरून सेमी कंडक्टरच्या व्यवसायासाठी चांगले अभियंते आपल्याला मिळू शकतील.ब्लुमबर्गने दिलेल्या वृत्तानुसार, रघुराम राजन म्हणाले की, भारताने सध्या अर्थव्यवस्थेच्या अवाजवी प्रसिद्धीवर जो विश्वास टाकलाय, तो चिंतेचा विषय आहे. “अर्थव्यवस्था रुळावर आणण्यासाठी आपल्याला अनेक वर्ष कठोर परिश्रम करावे लागले होते.

### आपल्याकडे प्रचंड मनुष्यबळ

» सध्या अर्थव्यवस्थेबद्दलची जी प्रसिद्धी केली जात आहे, ती राजकारण्यांकडून होत आहे. कारण त्यांना त्याची गरज आहे. पण इतर भारतीय नागरिकांनी त्यावर विश्वास ठेवणे, ही सर्वात मोठी चूक होऊ शकते.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ रोजी भारत विकसित राष्ट्र बनलेले असेल, असे ध्येय ठेवलेले आहे. याबद्दल प्रश्न विचारला असता रघुराम राजन म्हणाले की, हे ध्येय मूर्खपणाचे आहे. जर देशातल्या मुलांना माध्यमिक शिक्षण मिळत नसेल, अनेक विद्यार्थी शिक्षण घेण्यापासून वंचित राहत असतील, तर हे ध्येय गाठता येणार नाही. “आपल्याकडे प्रचंड मनुष्यबळ आहे. पण या मनुष्यबळाच्या हाताला काम दिले नाही, तर त्याचा काहीही उपयोग होणार नाही. त्यामुळे भारताला सर्वातआधी या मनुष्यबळाचे कौशल्य विकसित करून त्यांना काम करण्यासाठी तयार करावे लागेल आणि त्यानंतर त्यांना रोजगारही उपलब्ध करून द्यावा लागेल”, असे रघुराम राजन यांनी स्पष्ट केले.राजन यांनी घसरलेल्या शैक्षणिक दर्जावरही भाष्य केले. ते म्हणाले, भारतीय शालेय विद्यार्थ्यांची शिकण्याची पात्रता करोना महामारीनंतर २०१२ च्या पूर्वीच्या स्तरावर पोहोचली आहे. इयत्ता तिसरीतील २०.०५ टक्के विद्यार्थ्यांना वाचता येत नाही आणि इयत्ता दुसरीतील मुलांना लिहिता येत नाही.

# भारत माता की जय’ आणि ‘जय हिंद’ हे नारे रचणारे मुस्लीम

## केरळच्या मुख्यमंत्र्यांनी केलेल्या दाव्यामुळे वादाची शक्यता

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी नागरिकत्व दुरूस्ती कायद्याच्या विरोधात आंदोलन करत असताना एक दावा केला आहे. या दाव्यामुळे आता वाद उफाळण्याची शक्यता आहे. मल्लपुरम येथे सीएए विरोधी आंदोलनात बोलत असताना मुख्यमंत्री म्हणाले की, भारत माता की जय आणि जय हिंद या नाऱ्यांचा शोध मुस्लीम नागरिकांनी लावला.**

तसेच भाजपा सरकार भारताचा सांस्कृतिक इतिहास पुसून टाकण्याचा आरोप करत आहे, असाही आरोप मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी केला. यावेळी त्यांनी भारत माता की जय हा नारा कुणी दिला? याबाबत माहिती दिली. मात्र त्याचा ऐतिहासिक पुरावा त्यांनी दिलेला नाही.मुस्लीम लोकांना दुय्यम दर्जाचे नागरिकत्व देणे किंवा मुस्लीमांना देशाच्या बाहेर हुसकावण्यासाठी त्यांच्या समुदायाची विशिष्ट ओळख निर्माण करण्याचा उद्देश संघ परिवाराचा असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले. आपण पाहिलं की, संघ परिवाराचे नेते येऊन भाषणं करतात. यावेळी उपस्थित लोकांना ते भारत माता की जय, अशा घोषणा देण्यास सांगतात. हा नारा संघ परिवाराशी निगडित व्यक्तीने शोधला आहे का? हा नारा सर्वप्रथम ज्याने



दिला, त्या व्यक्तीचे नाव आहे अझिमुल्ला खान. १९व्या शतकात मराठा पेशवे नाना साहेब यांचे ते प्रधान असल्याचा दावाही मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी केला. मुस्लीम नागरिकाने हा नारा शोधल्यामुळे ते कदाचित उद्या हा नारा देणेच बंद करतील का? याबाबत मला तरी कल्पना नाही”, असेही मुख्यमंत्री पिनराई विजयन म्हणाले. तसेच जय हिंद हा नारादेखील मुस्लीम नागरिक असलेल्या अबिद हसन साफ्रानी यांनी दिला असल्याचाही दावा पिनराई विजयन यांनी केला. संघ परिवाराचे जे लोक मुस्लीमांनी हा देश सोडून जावे, असे सांगतात. त्यांनी या ऐतिहासिक सत्याकडे डोळे उघडे ठेवून पाहावे, असेही आवाहन त्यांनी केले. त्यानंतर “सारे जहाँ से अच्छा...” हे लोकप्रिय गीत मोहम्मद इक्बाल यांनी रचले असल्याचीही आठवण करून दिली. मुस्लीम शासकांनी आणि इतरांनी भारताच्या इतिहासात आणि संस्कृतीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. तसेच मुस्लीमामधील एका मोठ्या वर्गाने स्वातंत्र्य चळवळीच्या आंदोलनात महत्त्वाची भूमिका बजावली, असेही ते म्हणाले.पुढे पिनराई विजयन यांनी काँग्रेस पक्षावरही टीका केली. २०१९ साली केंद्र सरकारने नागरिकत्व दुरुस्ती विधेयक आणल्यापासून काँग्रेसला देशव्यापी आंदोल उभे करता आले.

### सीएएची अंमलबजावणी होऊ देणार नाही

» नाही, असे ते म्हणाले. एवढेच नाही तर सीएए कायद्याची अधिसूचना काढल्यानंतरही या विषयावर भूमिका जाहीर करण्यात काँग्रेस पक्षाला अपयश आले आहे, असेही ते म्हणाले.आमचे सरकार संघ परिवाराच्या उद्देशाचा विरोध करत राहिल. तसेच सीएएची अंमलबजावणी आम्ही होऊ देणार नाही, असेही पिनराई विजयन यांनी जाहीर केले. या कायद्यामुळे संविधानातील तरतुदींचे उल्लंघन होत आहे. २०२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०० वर्ष पूर्ण होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर भारतामध्ये फूट पाडणारा उद्देश साध्य करण्यासाठी त्यांनी हा कायदा आणला असल्याचेही ते म्हणाले.

# किरणने सांगितला लग्नानंतर झालेल्या ट्रोलिंगचा अनुभव

अभिनेता आमिर खानने किरण रावशी दुसरं लग्न केलं होतं. आमिर व रीना दत्ता यांचा घटस्फोट झाल्यावर त्याने किरणशी लग्न केलं होतं. किरण चश्मा लावते, त्यामुळे आमिरशी लग्न केल्यावर खूप ट्रोलिंगचा सामना करावा लागला होता, असा किरण रावने खुलासा केला आहे. लोक तिच्या लूकची खिल्ली उडवायचे, असं ती म्हणाली. किरण व आमिर तीन वर्षांपूर्वी विभक्त झाले आहेत. पण ते त्यांच्या मुलाचा एकत्र सांभाळ करतात. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत किरणने महिला दिग्दर्शकांना त्यांचे चित्रपट प्रदर्शित करताना येणाऱ्या आव्हानांबद्दल विधान केलं. इंडस्ट्रीमध्ये पुरुषांच्या तुलनेत महिलांना मिळणाऱ्या सन्मानाबद्दल ती बोलली. याचबरोबर तिने आमिर खानशी लग्न केल्यावर झालेल्या टीकेबाबतही सांगितलं.किरणने आमिरशी लग्न केल्यानंतर तिला ट्रोल करण्यात आलं होतं. 'कोणत्या चश्मिष महिलेशी आमिर खानने लग्न केलंय?', असं लोक म्हणायचे. लोकांचं विविध प्रकारचं बोलणं ऐकूनही आपण नेहमीच आपल्या स्वातंत्र्याला महत्त्व दिलं आणि आपलं काम सुरू ठेवलं, असं ती सांगते. तसेच आता मी अशा टप्प्यावर पोहोचली आहे जिथे इतरांच्या मतांना मी महत्त्व देत





नाही, असंही तिने नमूद केलं.किरणच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास नुकताच तिचा 'लापता लेडीज' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला. काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झालेला हा चित्रपट हिट झाला. प्रेक्षकांकडून या चित्रपटाला खूप चांगला प्रतिसाद मिळाला.लोक तिच्या लूकची खिल्ली उडवायचे, असं ती म्हणाली. किरण व आमिर तीन वर्षांपूर्वी विभक्त झाले आहेत. पण ते त्यांच्या मुलाचा एकत्र सांभाळ करतात. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत किरणने महिला दिग्दर्शकांना त्यांचे चित्रपट प्रदर्शित करताना येणाऱ्या आव्हानांबद्दल विधान केलं. इंडस्ट्रीमध्ये पुरुषांच्या तुलनेत महिलांना मिळणाऱ्या सन्मानाबद्दल ती बोलली. याचबरोबर तिने आमिर खानशी लग्न केल्यावर झालेल्या टीकेबाबतही सांगितलं. किरणने आमिरशी लग्न केल्यानंतर तिला ट्रोल करण्यात आलं होतं. 'कोणत्या चश्मिष महिलेशी आमिर खानने लग्न केलंय?', असं लोक म्हणायचे.

## प्रियांकाने साजरी केली धुळवड

होळीचा सण आला आणि काल धुळवड मोठ्या प्रमाणात साजरी झाली. मनोरंजनसृष्टीतील अनेक कलाकारांनी मोठ्या उत्साहात रंगपंचमी साजरी केली. बॉलीवूडमधील अनेक कलाकारांचे रंगपंचमी साजरी करतानाचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले. बॉलीवूडचं लोकप्रिय कपल प्रियांका आणि निकनेसुद्धा काल होळीचा आनंद लुटला. चोप्रा कुटुंबाने भव्य होळीची पार्टी आयोजित केली होती. प्रियांका आणि निक जोनासची लाडकी लेक मालतीची भारतातली ही पहिलीच धुळवड होती. होळीतील प्रियांका, निक आणि मालतीचे फोटो सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहेत. यातल्या एका फोटोमध्ये प्रियांका तिचा मित्रपरिवार आणि कुटुंबाबरोबर दिसतेय. यात मालतीने सफेद रंगाचा ड्रेस आणि टोपी घातली आहे.

## दियाचा प्रोजेक्ट काय ?

बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री दिया मिर्झाचा नवा प्रोजेक्ट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या प्रोजेक्टमध्ये काही मराठी कलाकारांची वर्णी लागली आहे. या मराठी कलाकारांनी सोशल मीडियावर पोस्ट करून दियाच्या नव्या प्रोजेक्टची माहिती दिली आहे. दिया मिर्झाची 'पन्हं' या नावाची नवीन शॉर्ट फिल्म भेटीस येत आहे. या शॉर्ट फिल्मची दिया ही निर्माती असून यामध्ये बरेच मराठी कलाकार झळकणार आहे. यात 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम अभिनेता पृथ्वीक प्रताप पाहायला मिळणार आहे. यासंदर्भात त्याने सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली. "हृदयाच्या कोपऱ्यातला अत्यंत लाडका प्रोजेक्ट..'पन्हं'", असं कॅप्शन लिहीत त्याने काही फोटो शेअर केले आहेत.याशिवाय पृथ्वीकसह अभिनेत्री सायली संजीव देखील दियाच्या आगामी प्रोजेक्टमध्ये दिसणार आहे. तिने देखील इन्स्टाग्राम स्टोरीवर या प्रोजेक्टसंबंधित पोस्ट शेअर केली आहे. "या प्रोजेक्टचा एक भाग होण्याचा मला खूप आनंद आहे," असं लिहून तिने एक फोटो शेअर केला आहे.पृथ्वीक प्रताप व सायली संजीवबरोबर अभिनेता सुहास शिरसाट देखील 'पन्हं' या शॉर्ट फिल्ममध्ये झळकणार आहे. यासंदर्भात सुहासने इन्स्टाग्राम स्टोरी शेअर केली आहे. "एका दमदार टीमबरोबर नवीन काम", असं लिहितं अभिनेत्याने क्लॅपचा फोटो शेअर केला आहे.दरम्यान, दिया मिर्झाची ही शॉर्ट फिल्म काय आहे?



## लाथ मारल्यामुळे वरुण भडकला

आयपीएलच्या हंगामाला नुकतीच सुरुवात झाली असून, रविवारी मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्सचा सामना पार पडला. सामन्यादरम्यान अचानक एक श्वान मैदानात घुसल्याने सगळ्यांची तारांबळ उडाली. पोलीस आणि इतर लोक त्या धावत्या श्वानाला पकडण्यासाठी पाय मधे टाकून त्याला अडविण्याचा प्रयत्न करत होते. हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. या प्रकारामुळे बॉलीवूडमधील अनेक कलाकारांनी संताप व्यक्त केला आहे. मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्या जेव्हा गोलंदाजीसाठी सज्ज झाला तेव्हा श्वान मैदानात घुसला. त्यामुळे सामना थोडा वेळ थांबविण्यात आला. हार्दिक पांड्याने कुत्र्याला आपल्याकडे बोलावले असता, स्टेडियममधील ग्राउंड स्टाफने पाठलाग करून, कुत्र्याला मैदानातून हाकलून दिले.'स्ट्रीट डॉग्स ऑफ बॉम्बे'च्या अधिकृत इन्स्टाग्राम पेजवर हा व्हिडीओ शेअर करण्यात आला होता. श्वानाला अथकपणे लाथ मारल्यामुळे आणि त्याचा पाठलाग केल्याबद्दल त्यांनी ग्राउंड स्टाफला फटकारले. हा व्हिडीओ आपल्या स्टोरीवर शेअर करीत, वरुण धवनने आपला संताप व्यक्त केला. "श्वान काही फुटबॉल नाही. श्वान कोणाला नुकसान पोहोचवत नाही किंवा तो चावतही नाही आहे. बेपर्वाईनं वागण्यापेक्षा याबाबत एक चांगला मार्ग योजणं आवश्यक आहे," अशा शब्दांत वरुणने श्वानाबरोबर गैरवर्तन करणाऱ्यांना फटकारले.सामन्यादरम्यानचा श्वानाचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे. श्रद्धा कपूरचा भाऊ सिद्धांत कपूरनेसुद्धा कमेंट करीत आपला राग व्यक्त केला आहे. "हा व्हिडीओ म्हणजे आजच्या काळातील मानवतेच्या स्थितीचं हे वर्णन आहे. हे खूप लज्जास्पद आहे."

## मी शाहरुख खानसमोर तासभर रडले होते

प्रसिद्ध कोरिओग्राफर व दिग्दर्शक फराह खान आणि शाहरुख खान खूप जवळचे मित्र आहेत. एका मुलाखतीत, फराहला ४० व्या वर्षी आयव्हीएफद्वारे गर्भधारणा झाली, होती. ती तीन बाळांना जन्म देणार आहे, ही आनंदाची बातमी कुटुंबाबाहेरच्या कुणाला दिली असेल तर तो शाहरुख पहिला होता, असा खुलासा फराहने केला आहे. 'ओम शांती ओम'चे शूटिंग करत असताना फराह गरोदर होती, त्यावेळी शाहरुख सेटवर खूप काळजी घ्यायचा, असं फराहने सांगितलं.नोव्हा आयव्हीएफ फर्टिलिटी यूट्यूब चॅनलला दिलेल्या मुलाखतीत फराहने सांगितलं की ती शूटच्या आधी आणि नंतर आयव्हीएफ उपचारांसाठी जायची. ते क्लिनिक सेटपासून एक तासाच्या अंतरावर होते. सुरुवातीला उपचारात खूप अडचणी येत होत्या, तेव्हा सेटवर परत येताना रडायचे, असं फराह म्हणाली."पहिल्या पाच-सहा महिन्यांत खूप त्रास झाला. मला खूपदा डॉक्टरांनी भूल दिली होती. एकदा डॉक्टरकडे गेल्यावर मला खात्री होती की मी गरोदर आहे, पण मला दवाखान्यातच मासिक पाळी आली. त्यानंतर बऱ्याचदा मी दवाखान्यातून शूटिंगला परत येईपर्यंत रडत असे. एके दिवशी मध्यरात्री मला डॉक्टरांचा फोन आला आणि सांगितलं की मी गरोदर नाही. आम्ही एक कॉमिक सीन शूट करत होतो. शाहरुखला कळालं की मला काहीतरी झालंय, कारण मी रडण्याच्या तयारीत होते. मग त्याने सर्वांना ब्रेक दिला आणि मला त्याच्या व्हॅनमध्ये नेलं, असं फराह म्हणाली.मी म्हणाले, 'मला तुला काहीतरी सांगायचं आहे'. त्याने माझ्याकडे पाहिलं आणि म्हणाला, 'तू गरोदर आहेस का?' आम्हाला दर्दे-ए-डिस्को गाण्याचं शूटिंग संपवायचं होतं आणि प्रत्येक वेळी तो शर्ट काढायचा तेव्हा मी त्याचं शर्ट वर फेकून देत असे. तो माझ्यासमोर बादली ठेवायचा.



# चेन्नईचा गुजरातवर 63 धावांनी विजय!

## युवाशक्ती मुकाबल्यात ऋतुराजची शुबमनवर सरशी

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**चेन्नई सुपर किंग्सच्या संघाने गुजराट टायटन्सवर ६३ धावांनी एकतर्फी विजय मिळवला. सामन्याच्या सुरूवातीपासूनच चेन्नईने आपली पकड कायम ठेवली होती. गुजरात संघाने नाणेफेक गमावत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला पण तो काही फायदेशीर ठरला नाही. चेन्नईने सुरूवातीपासून आक्रमक पवित्रा घेत धावांचा पाऊस पाडला. सीएसकेच्या प्रत्येक फलंदाजाने धावफलकात आपले योगदान दिले आणि संघाची धावसंख्या २०६ वर नेऊन ठेवली. गोलंदाजीतही चेन्नईने आपली चमक दाखवत गुजरातच्या फलंदाजांना टिकू दिले नाही. दोन नव्या युवा कर्णधारांच्या मुकाबल्यात ऋतुराज गायकवाडने बाजी मारली.**




गुजरातच टायटन्सचे फलंदाज या सामन्यात अयशस्वी ठरले. साई सुदर्शन वगळता एकाही फलंदाजाला ३० चा आकडाही गाठता आला नाही. साई सुदर्शनने ३१ चेंडूत ३ चौकारांच्या मदतीने ३७ धावा केल्या. संघाचे दोन्ही सलामीवीर शुबमन गिल (८) आणि रिध्दिमान साहा (२१) हे मोठी खेळी करू शकले नाही, याचा संघाला फटका बसला. या दोघांनाही दीपक चाहरने बाद केले. त्यानंतर मिचेलच्या गोलंदाजीवर धोनीने झेप घेत एक जबरदस्त कॅच पकडली आणि विजय शंकरला (१२) बाद केले. धोनीच्या या कॅचचा व्हीडिओ सगळीकडे व्हायरल होत आहे.डेव्हिड मिलरही मोठी कामगिरी करू शकला नाही आणि तो २१ धावा करत देशपांडेच्या गोलंदाजीवर बाद झाला. धोनीनंतर रहाणेने सुध्दा एक कमाल झेल टिपला. तर ओमरजाईदेखील ११ धावांवर खेळत असताना देशपांडेकडून झेलबाद झाला. यानंतर राहुल तेवतिया (६) आणि राशीद खान (१) यांना मुस्तफिझूर रहमानने झेलबाद केले. हे दोन्ही झेल रचिन रवींद्रने घेतले. उमेश यादवने १ षटकार लगावत १० धावा केल्या तर जॉन्सने ५ धावा केल्या. एकंदरीतच गुजरातचे फलंदाज फेल झाल्याने संघाला तब्बल ६३ धावांनी पराभव पत्करावा लागला आहे.तत्पूर्वी गुजरातने नाणेफेक जिंकत गोलंदाजीचा निर्णय घेतला. पण चेन्नईच्या फलंदाजांच्या फटकेबाजीला आळा घालण्यात ते अपयशी ठरले. सलामीवीर रचिन रवींद्रने तर इतक्या वेगाने धावा केल्या जणू काही बॅटला स्प्रिंग लावून आला होता.चेंडू आला की तो थेट सीमारेषेबाहेरच. रचिनने २० चेंडूत ३ षटकार आणि ६ चौकारांच्या मदतीने ४६ धावा केल्या. अवघ्या ४ धावांनी त्याचे पहिले अर्धशतक हुकले. राशीद खानच्या गोलंदाजीवर त्याला साहाने स्टंपिंग करत बाद केले. त्यानंतर ऋतुराजने फटकेबाजी सुरू केली आणि त्याने ५ चौकार आणि एका षटकारासह ४६ धावा केल्या. अजिंक्य रहाणे मात्र १२ धावा करत स्वस्तात बाद झाला. पण तो बाद झाला तरी संघाच्या धावांना ब्रेक नाही लागला. रहाणेनंतर आलेल्या शिवम दुबेने पहिल्या चेंडूपासून आक्रमक पवित्रा घेतला आणि बाद झाल्यानंतरच तो शांत झाला. दुबेने २३ चेंडूत ५ षटकार आणि २ चौकारांसह ५१ धावा केल्या. त्याच्या या कामगिरीसाठी त्याला सामनावीर घोषित केले. डॅरिल मिचेल २४ धावा करत नाबाद राहिला. पण या सगळ्यांसोबतच पहिला आयपीएल सामना खेळणारा समीर रिझवीने षटकारांने आपले खाते उघडले आणि ६ चेंडूत २ षटकारांसह १४ धावा करत बाद झाला. मोहित शर्माने त्याला मिलरकडून झेलबाद केले. तर जडेजा ७ धावा करत धावबाद झाला. गुजरातकडून राशीद खानने २ विकेट तर साई किशोर, स्पेन्सर जॉन्सन आणि मोहित शर्माने १ विकेट घेतली. तर आयपीएलमधील सलग दुसरा विजय नोंदवणाऱ्या चेन्नईकडून दीपक चाहरने २, तुषार देशपांडे २ आणि मुस्ताफिजूर २ विकेट्स घेतले. तर मिचेल आणि पाथिरानाला एक विकेट घेण्यात यश मिळाले.

### रहाणेने एक कमाल झेल टिपला

गुजरातच टायटन्सचे फलंदाज या सामन्यात अयशस्वी ठरले. साई सुदर्शन वगळता एकाही फलंदाजाला ३० चा आकडाही गाठता आला नाही. साई सुदर्शनने ३१ चेंडूत ३ चौकारांच्या मदतीने ३७ धावा केल्या. संघाचे दोन्ही सलामीवीर शुबमन गिल (८) आणि रिध्दिमान साहा (२१) हे मोठी खेळी करू शकले नाही, याचा संघाला फटका बसला. या दोघांनाही दीपक चाहरने बाद केले. त्यानंतर मिचेलच्या गोलंदाजीवर धोनीने झेप घेत एक जबरदस्त कॅच पकडली आणि विजय शंकरला (१२) बाद केले. धोनीच्या या कॅचचा व्हीडिओ सगळीकडे व्हायरल होत आहे.डेव्हिड मिलरही मोठी कामगिरी करू शकला नाही आणि तो २१ धावा करत देशपांडेच्या गोलंदाजीवर बाद झाला. धोनीनंतर रहाणेने सुध्दा एक कमाल झेल टिपला.

---

# भारताचा स्टार फलंदाज कोहली दोन महिने कुठे होता?

## पंजाब किंग्जविरुद्धच्या सामन्यात 77 धावांची खेळी

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयपीएलच्या १७व्या हंगामातील सहावा सामना सोमवारी एम. चिन्नास्वामी स्टेडियम बंगळुरु येथे पार पडला. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि पंजाब किंग्ज आमनेसामने होते. ज्यामध्ये आरसीबीने पीबीकेएसचा ४ विकेट्सनी पराभव केला. यानंतर विराट कोहलीला त्याच्या शानदार अर्धशतकी खेळीसाठी सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. यावेळी कोहलीने खुलासा केली की तो मागील काही दिवसापूर्वी आपल्या देशात नव्हता. तसेच तो जिथे त्याच्या कुटुंबाबरोबर वेळ घालवत होता, तिथे त्याला लोक ओळखत नव्हते.**




विराट कोहली आपल्या दुसऱ्या मुलाच्या जन्मामुळे इंग्लंडविरुद्धच्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत खेळू शकला नाही. दरम्यान, त्याने कुटुंबासोबत चांगला वेळ घालवला. आयपीएलमध्ये पंजाब किंग्जविरुद्धच्या सामन्यात ७७ धावांची खेळी करून आरसीबीच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावल्यानंतर कोहलीने हे वक्तव्य केले. त्याने सांगितले की, कुटुंबासह बराच वेळ घालवून चांगले वाटत आहे. विराट कोहली म्हणाला, “आम्ही देशात (भारतात) नव्हतो. आम्ही अशा ठिकाणी होतो, जिथे लोक आम्हाला ओळखत नव्हते. मी दोन महिने माझ्या कुटुंबासह सामान्य माणसाप्रमाणे वेळ घालवला. एक कुटुंब म्हणून आमच्यासाठी हा एक अद्भुत अनुभव होता. मला माझ्या कुटुंबाबरोबर वेळ घालवण्याची संधी मिळाली याबद्दल मी देवाचा ऋणी आहे.”किंग कोहली पुढे म्हणाले, “आपल्याला कोणीही ओळखत नसताना सामान्य माणसाप्रमाणे रस्त्यावरून चालणे आणि सर्वसामान्यांसारखे दैनंदिन जीवन जगणे हा एक अद्भुत अनुभव होता.” १५ फेब्रुवारी २०२४ रोजी कोहली दुसऱ्यांदा वडील झाला, जेव्हा त्याची पत्नी अनुष्काने एका मुलाला जन्म दिला. या दोघांनी आपल्या मुलाचे नाव अकाय ठेवले आहे.

### कोहलीने झळकावले 51 वे अर्धशतक

आयपीएलच्या पहिल्या सामन्यात मोठी खेळी खेळण्यात अपयशी ठरल्यानंतर दुसऱ्या सामन्यात कोहलीने शानदार फलंदाजी केली. पंजाबने विजयासाठी दिलेल्या १७७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आरसीबीने चार चेंडू बाकी असताना रोहमर्षक विजय मिळवला. या सामन्यात विराट कोहलीने आयपीएल कारकीर्दीतील ५१वे अर्धशतक झळकावले. कोहलीने ४९ चेंडूंत ११ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ७७ धावा केल्या. आरसीबीला शेवटच्या २४ चेंडूंमध्ये ४७ धावांची गरज होती, तेव्हा दिनेश कार्तिकने दहा चेंडूत नाबाद २८ धावा केल्या आणि ‘इम्पॅक्ट प्लेयर’ महिपाल लोमरोरने आठ चेंडूत नाबाद १७ धावा केल्या. तसेच कार्तिकने फिनिशरची भूमिका अतिशय चोख बजावली.